पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ५६

**सभावृत्तांत**

दिनांक - १६.०४.२०१३ वेळ - दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक १६/०४/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जगताप नवनाथ दत्तू - सभापती
२) मा. अविनाश (दादा) टेकावडे
३) मा. विनया प्रदिप (आबा) तापकीर
४) मा. छाया जगन्नाथ साबळे
५) मा. सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
६) मा. भालेकर अरुणा दिलीप
७) मा. वाघेरे सुनिता राजेश
८) मा. महेशदादा किसन लांडगे
९) मा. बारणे माया संतोष
१०) मा. लोंढे गणेश नारायण
११) मा. कदम सदगुरु महादेव
१२) मा. भोंडवे संगिता राजेंद्र
१३) मा. शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.आयुक्त – डॉ.श्रीकर परदेशी, मा.प्रकाश कदम – अति.आयुक्त मा.झुरे- सह आयुक्त, मा.मुंढे, मा.कारचे, मा.दुरगुडे, मा.फुंदे,मा.पवार, मा.ढेरे – सहाय्यक आयुक्त, मा.घाडगे – मुख्य लेखापरीक्षक, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहरअभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.चव्हाण – सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.भदाणे- उपसंचालक नगररचना, मा.दुधेकर, मा.ढगे, मा.निकम, मा.सवणे,मा.सय्यद मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, मा.कुदळे, मा.कपिले, मा.थोरात, मा.साळवी, मा.पठाण,

मा.लडकत, मा.बरशेटटी, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मा.जावळे – वैद्यकिय अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-**

**विषय क्र.६** - जागतिक बँकेने सुचवल्याप्रमाणे पुणे मुंबई रस्त्याची बी.आर.टी.सेवा सुरु करण्यापूर्वी सेप्टी ऑडीट करणेकरिता आयआयटी मुंबई यांना र.रु.१६,४०,४५६/- फी अदा करणेबाबत.

**विषय क्र.७** - वाहने भाडयाने घेणेबाबत.मा.सुषमा तनपुरे, मा.माया बारणे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.८** - १० टाटा सुमो भाडयाने घेणेबाबत - मा.सुषमा तनपुरे, मा.माया बारणे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.९ -** भोसरी येथील मनपाचे पै. धोंडिबा उर्फ गणपत नारायण फुगे,मैदान व हॉल चालविणेस देणेबाबत - मा. सुषमा तनपुरे, मा.माया बारणे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.१०-** सांगवी येथील मैदाने चालविणेकामी देणेबाबत - मा. सुषमा तनपुरे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

-----------

**दिनांक ०९/०४/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक-५५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ३२७३ | विषय क्रमांक – १ |
| दिनांक – १६/४/२०१३ | विभाग – स्थापत्य |
| सुचक – मा.अविनाश टेकावडे | अनुमोदक – मा.माया बारणे |

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/८३/२०१३ दि.१९/३/२०१३.

विषय - मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधील अ.क्र. ३० अन्वये प्रभाग क्र. ८९ येथील ब्रम्हवृंद कॉलनी व नवीन बाणेर पुलाकडे जाणा-या रस्त्याच्या सी डी वर्क बांधणेबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ३२७४ विषय क्रमांक – २
दिनांक – १६/४/२०१३ विभाग – अ प्रभाग
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचेक्र.अप्र/नि/२/कावि/४३८/२०१३ दि.१/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.५/२०१२-१३ मधील अ.क्र. १ अन्वये अ प्रभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील प्रभाग क्रमांक १४ व १७ कुंडीविरहित वॉर्ड योजनेअंतर्गत घरोघरचा कचरा अलगीकरण करुन गोळा करणे व वॉर्डातील कचरा उचलणे व विल्हेवाट लावणेकामी वाहने भाडयाने घेणेकामी मे.भगवंत कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराची निविदा प्रती दिन २ वाहने ४ खेपांचा मोशी कचरा डेपो पर्यंतचा दर र.रु. ७४००/- (र.रु.सात हजार चारशे फक्त) हा दर सर्वांत कमी असल्याने सदरची निविदा स्विकारणेस व त्यांच्याबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी नि.नो.क्र.५/२०१२-१३ मधील अ.क्र. १ अन्वये, अ प्रभाग कार्यक्षेत्रामधील प्रभाग क्र. १४ व १७ कुंडीविरहित वॉर्ड योजनेअंतर्गत कचरा अलगीकरण करणेकामी वाहने भाडयाने घेण्याची निविदा रदद करुन नवीन निविदा काढण्यास मान्यता देण्यात येत आहे व तोपर्यंत सध्याचे ठेकेदास त्याचे लघुत्तम मंजूर दराने त्या कालावधीकरीता काम देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२७५ विषय क्रमांक – ३
दिनांक – १६/४/२०१३ विभाग – वायसीएमएच
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.वायसीएमएच/भांडार/१अ/कावि/७६/२०१३ दि.४/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वाय.सी.एम.रुग्णालयाचे डायलिसिस विभागाकरिता Gambro कंपनीचे 01 नग "Pressure Transkit" (Gambro कंपनी) चे मशिन खरेदी मे. मनाली एंटरप्रायजेस पिंपरी – १८ यांचे प्राप्त कोटेशन दरानुसार घेणेस मंजुरी व त्याकामी येणा-या र.रु. ६४,०९६/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक – ३२७६ विषय क्रमांक – ४
दिनांक – १६/४/२०१३ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/५/कावि/२३८/२०१३दि.१०/०४/२०१३.

विषय – वायसीएम रुग्णालयातील अंतर्गत व बाहय परिसराची दैनंदिन साफसफाई बाबत.

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२७७ विषय क्रमांक – ५
दिनांक – १६/४/२०१३ विभाग – भूमी जिंदगी
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक–मा.अरुणा भालेकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.भूजि/१/कावि/१३६/२०१३ दि.१०/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावासोबत जोडलेल्या पिंपरी चिंचवड मनपा भूमि आणि जिंदगी विभागाच्या मिळकत वाटप नियमावली २०१३ यास मान्यता मिळणेकामी व त्यानुसार शासनास सादर करणेकामी सदरच्या विषयास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३२७८ विषय क्रमांक – ६
दिनांक – १६/४/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.स्था/ BRTS/३८८/२०१३ दि.९/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नागरिकांना सार्वजनिक वाहतूक सेवा पुरविणे अंतर्गत बीआरटीएस सेवा पुरविणेसाठी रस्ते व बीआरटीएस सेवा अनुषंगिक कामे

विकसीत करणे हाती घेतले आहे. सेप्टी ऑडीट करणेकरिता आयआयटी, मुंबई यांनी काम करणेस तयारी दर्शविलेचा मेल केला आहे. दिनांक २९ मार्च रोजी फी व इतर काही

बाबी बाबत खुलासा करणेकामी विचारणा केली असता दिनांक ३० मार्च रोजी फी कमी करुन र.रु. १४,६०,०००/- अधिक सर्व्हीस टॅक्स व इतर टॅक्स असे एकूण र.रु. १६,४०,४५६/- इतकी फी कळविलेली आहे. व सदरचा खर्च हा मुंबई पुणे रस्ता दापोडी ते निगडी Dedicated BRTS lane या उपलेखाशिर्षातून करणेस तसेच सदरची रक्कम आय.आय.टी.मुंबई यांना अदा करावयाच्या र.रु. १६,४०,४५६/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२७९ विषय क्रमांक – ७
दिनांक – १६/४/२०१३
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.माया बारणे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावीपणे अमलबजावणी करणेकामी भाडे तत्वावर घेणेत आलेल्या दरा वाहनांपैकी ५ वाहनांचा खर्च खाजगी वाहन भाडे व ५ वाहनांचा खर्च शासकीय योजनेची अंमलबजावणी या लेखाशिर्षावर मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

| क्र. | वाहन पुरवठा धारकाचे नांव | वाहन क्रमांक | रुग्णालयाचे नाव | दर | कालावधी | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीम. कल्पना कोकाटे | एमएच१४ /पी ५९०६ | सांगवी रुग्णालय | प्रतिवाहन प्रति दिन८० किमीसाठी र.रु.८००/- दराने व त्यापुढील प्रत्येक किमीसाठी र.रु. ५/- या दराने | दि.१ मार्च २०१३ते दि.३१ मार्च २०१३ | खाजगी वाहन भाडे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | श्री.आलमगिर नायकवाडी | एमएच १४ /पी ६५५९ | थेरगांव रुग्णालय | | | |
| ३. | श्रीम.अलका साठे | एमएच १२ /जे ए ३६८१ | जिजामाता रुग्णालय | | | |
| ४. | श्री.सुहास भेगडे | एमएच १४ /पी ४७५६ | यमुनानगर रुग्णालय | | | |
| ५. | श्री.धनाजी जगताप | एमएच १४ /पी ४७५१ | आकुर्डी रुग्णालय | | | |
| ६. | सौ.सपना प्रियांक लोखंडे | एमएच १४ /डि एफ ४३५७ | भोसरी रुग्णालय | | | शासकिय योजनांची अंमलबजावणी |
| ७. | श्री.सुनिल रॉय | एमएच १४ / १४३८ | वायसीएम रुग्णालय | | | |
| ८. | श्री.बाजीराव चिंचवडे | एमएच १४ /पी ६४९३ | वाल्हेकरवाडी दवाखाना | | | |
| ९. | श्री.यशवंत कुदळे | एमएच १४ /५८१ | पिंपळे सौदागर दवाखाना | | | |
| १०. | श्री.विठठल कारंडे | एमएच १४ /पी २००३ | वैद्यकिय मुख्यालय | | | |

तरी राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी खाजगी वाहने भाडे या लेखाशिर्षावर घेणेत आलेली ५ वाहने व शासकिय योजनांची अंमलबजावणी व लेखाशिर्षावर घेणेत आलेली ५ वाहने अशी एकूण १० वाहनांना प्रतिदिन प्रतिवाहन प्रति ८० किमीसाठी र.रु. ८००/- व त्यापुढील प्रत्येक किमीसाठी र.रु. ५/- या दराने दिनांक १/३/२०१३ ते दिनांक ३१/३/२०१३ या कालावधीसाठी मुदतवाढ देणेकामी व सदर वाहनांना येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२८०　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक – ८

दिनांक – १६/४/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे　　　　　　　　　　　　　अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.माया बारणे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी आवश्यक असणा-या १० टाटा सुमो अथवा तत्सम वाहने भाडे तत्वावर घेणेकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई- निविदा क्र. ८/२०१२-१३ मधील लघुत्तम निविदाधारक मे. गायत्री एंटरप्रायजेस यांचे निविदेतील लघुत्तम दर प्रतिवाहन प्रतिदिन प्रति ८० कि.मी.साठी र.रु.१३७७/- व त्यापुढील प्रत्येक किमीसाठी र.रु.९/- या दराने भाडे तत्वावर घेणेकामी व येणारा प्रत्यक्ष खर्च पाच वाहनांकरिता वैद्यकिय विभागाकडील खाजगी वाहन भाडे या लेखाशिर्षावर व पाच वाहनांकरिता शासकीय योजनांची अंमलबजावणी या लेखाशिर्षावर टाकण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२८१　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक – ९

दिनांक – १६/४/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे　　　　　　　　　　　　　अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.माया बारणे यांचा प्रस्ताव-

भोसरी येथील मनपाचे पै.धोंडीबा उर्फ गणपत नारायण फुगे मैदान व परिसरातील हॉल शिवराज मुद्रा प्रतिष्ठाण या संस्थेस सध्याचे दराने व अटी शर्तीनुसार ११ महिने कालावधीसाठी सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२८२ विषय क्रमांक – १०

दिनांक – १६/४/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक–मा.विनया तापकीर

संदर्भः- मा.सुषमा तनपुरे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव-

ड प्रभाग कार्यक्षेत्रातील नवी सांगवी स.नं.८३,८४ येथील आरक्षण क्र. ३३६ मधील तीन लॉन टेनिसची ग्राऊंड प्रतिभा महिला प्रतिष्ठान पिंपळेगुरव यांस योग्य त्या सेवाशुल्क तत्वावर ५ वर्षे कालावधी करीता देखभाल चालन कामी देण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(नवनाथ दत्तू जगताप)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/३९८/२०१३
दिनांक -१६/०४/२०१३.

प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.